संक्षिप्त

‘सिनेमा कट्टा’वर आज ‘बँक ऑफ डेव्ह’

नाशिक : येथील विश्वास ग्रुप आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या जलालपूर शाखेतर्फे चित्रपट प्रेमींसाठी ‘सिनेमा कट्टा’ उपक्रमांतर्गत शुक्रवारी सायंकाळी सहा वाजता ‘बँक ऑफ डेव्ह’ हा ब्रिटनचा चित्रपट दाखविण्यात येणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन क्रिस फॉगिन यांचे आहे. डिझास्टर मॅनेजमेंट सेंटर अॅण्ड ट्रेनिंग हब (विश्वास गार्डन शेजारी), ठाकूर रेसिडेन्सी, विश्वास बँकेसमोर, सावरकरनगर, गंगापूर रोड येथे हा चित्रपट दाखविण्यात येईल. चित्रपट पाहण्यासाठी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन विश्वास ग्रुपचे प्रमुख विश्वास ठाकूर, विश्वास ज्ञान प्रबोधिनीचे अध्यक्ष डॉ. मनोज शिंपी, रेडिओ विश्वासच्या समन्वयक ऋचिता ठाकूर यांनी केले आहे.

सटाणा वळणरस्ता कागदावरच

मंगरूळ टप्प्याचे कामही रखडले

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी सटाण्यातील सभेत ‘ठेकेदाराला रगडल्याशिवाय राहत नाही’, असा सज्जड दम भरून आता वर्षभराहून अधिक कालावधी उलटला, मात्र सटाणा वळणरस्त्याचा प्रश्न अद्यापही प्रलंबितच आहे. साक्री-शिर्डी राष्ट्रीय महामार्गावरील मंगरूळ ते सटाणा या टप्प्याचे काम रखडल्याने आणि वळणरस्त्याला मंजुरी न मिळाल्याने हा मार्ग आता अपघात प्रवणक्षेत्र बनला असून मंत्री गडकरींचे आश्वासन केवळ निवडणूक देखावा ठरल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

१७ नोव्हेंबर २०२४ रोजी विधानसभा निवडणुकीच्या धामधुमीत गडकरी यांनी आमदार दिलीप बोरसे यांच्या मागणीनुसार दिल्लीत गेल्यावर सटाणा वळणरस्ता तात्काळ मंजूर करण्याचे आश्वासन दिले होते. २३ नोव्हेंबरनंतर निर्णयाची मोहोर उमटेल, असे वाटत असतानाच आज वर्षभराहून अधिक कालावधी होऊनही ना निधीची घोषणा झाली, ना भूसंपादनाची हालचाल सुरू झाली. परिणामी, सटाणा शहरातून होणाऱ्या अवजड वाहतुकीने अपघात वाढत आहेत. मंगरूळ ते सटाणा दरम्यानचा रस्ता आजही अर्धवट स्थितीत आहे. निकृष्ट दर्जाचे काम, जागोजागी पडलेले खड्डे आणि उडणारी धूळ यामुळे वाहनचालकांना कसरत करावी लागत आहे.

खुद्द मंत्र्यांनी ज्या कामाला अत्यंत ढिले म्हटले होते, त्या कामात फारशी सुधारणा झालेली नाही. याउलट सुरक्षिततेच्या उपाय योजनांच्या अभावामुळे हा महामार्ग दररोज अपघातांना निमंत्रण देत आहे.

मध्यंतरी नाशिकमधील सामाजिक कार्यकर्ते पंडित अहिरे यांनी १२ फेब्रुवारी २०२५ रोजी दिल्ली गाठून केंद्रीय मंत्री गडकरींची भेट घेतली होती. आश्वासनांची आठवण करून दिली. खासदार डॉ. शोभा बच्छाव यांनीही पाठपुराव्याचे आश्वासन दिले. मात्र, प्रत्यक्षात चित्र बदललेले नाही. मोठ्या शहरांसाठी उड्डाणपूल आणि एक्सप्रेस मार्गांचे जाळे वेगाने विणणाऱ्या गडकरींना सटाण्यासारख्या ग्रामीण भागातील रस्ते का दिसत नाहीत, असा संतप्त सवाल स्थानिक नागरिक विचारत आहेत. शहरात विकासाची गंगा वाहते, मग ग्रामीण भाग केवळ धूळ खाण्यासाठीच का, अशी अस्वस्थता व्यक्त केली जात आहे. मागील अनेक वर्षांपासून पत्रकार संघ, वकील संघ आणि विविध संस्थांनी आंदोलने करूनही पदरी केवळ आश्वासनेच पडली आहेत. आता केवळ इशारे नको तर प्रत्यक्ष काम हवे, अशी ठाम भूमिका सटाणेकरांनी घेतली आहे.

बोलाचीच कढी..

नाशिक ते ताहाराबाद, नाशिक ते नामपूर या गावांकडे जाणारा मार्ग सटाणा शहरातून जातो. भरवस्तीतून हा मार्ग जात असल्याने या मार्गावर सटाणा शहरात कायम वाहतूक कोंडी होत असते. शिवाय, मालवाहू वाहनेही याच रस्त्याने जातात. ही कोंडी फोडण्यासाठी सटाणा शहराबाहेरुन वळण रस्ता काढण्याचे आश्वासन केंद्रीय मंत्र्यांसह खासदारांनी दिले होते. परंतु, अद्याप कार्यवाही नाही.

परप्रांतीय शिक्षकांकडून हिंदीची सक्ती, मनसेकडून खासगी क्लासमध्ये गोंधळ

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : परप्रांतीय शिक्षक मराठी विद्यार्थ्यांशी अरेरावी करतात, हिंदीत बोलण्यास भाग पाडतात, अशी तक्रार करीत मनसेच्या विद्यार्थी आघाडी पदाधिकाऱ्यांनी फिजिक्सवाला कोचिंग क्लासच्या व्यवस्थापनाला जाब विचारत एका शिक्षकाला मारहाण केली. हिंदीत बोलणाऱ्या शिक्षकांना सात दिवसांत राजीनामा घेऊन मूळ गावी परत पाठवावे, अन्यथा क्लासची तोडफोड केली जाईल, अशी धमकी दिल्याची तक्रार क्लास व्यवस्थापनाने दिली आहे. या प्रकरणी मनसेच्या पदाधिकाऱ्यांविरोधात सरकारवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शरणपूर रस्त्यावरील फिजिक्सवाला कोचिंग क्लासमध्ये ही घटना घडली. या क्लासमध्ये बहुसंख्य मराठी विद्यार्थी शिक्षण घेतात. त्यांना दुसरी भाषा समजून घेण्यात अडचणी येतात. क्लासमधील सर्व शिक्षक परप्रांतीय असून त्यांना मराठी नीट येत नाही. काही विद्यार्थ्यांना त्यांचे हिंदी समजत नाही. त्यामुळे विद्यार्थी व शिक्षकांमध्ये वाद होतात. अशाच वादात शिक्षकाने मराठी शिकवणार नाही, शिकायचे असेल तर हिंदीत शिका, अशी अरेरावी केल्याचे मनविसेचे म्हणणे आहे.

यासंदर्भात माहिती मिळाल्यानंतर महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे शहराध्यक्ष ललित वाघ, प्रदेश कार्यकारिणी सदस्य उमेश भोई, बाजीराव मते, उपजिल्हाध्यक्ष नितीन धानापुणे, शहर संघटक अक्षय कोंबडे, विभाग अध्यक्ष रोहित उगावकर आदींनी क्लासमध्ये जाऊन जाब विचारला. क्लासमध्ये शिकवणाऱ्या शिक्षकांची यादी मागितली. पांडे नामक शिक्षकाला हजर करण्याची मागणी केली. मुलांना मराठीस बोलण्यास प्रतिबंध करणाऱ्या एकाला मारहाण करण्यात आली. क्लासमधील सर्व परप्रांतीय शिक्षकांच्या राजीनाम्याची मागणी करीत पुढील आठ दिवसांत मराठी शिक्षकांची नियुक्ती करावी, अन्यथा पुन्हा आंदोलन छेडले जाईल, असा इशारा देण्यात आला. या घटनेमुळे क्लासमध्ये गोंधळ उडाला.

क्लासचे व्यवस्थापक यश द्विवेदी यांनी पोलिसांत तक्रार दिली. या प्रकरणी मनविसेचे कोंबडे, वाघ, उगावकर, मते आदींविरोधात सरकारवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

मनमाडजवळील अपघातामुळे वाहतूक विस्कळीत

लोकसत्ता वार्ताहर

मनमाड : शहरातून जाणाऱ्या इंदूर-पुणे राष्ट्रीय महामार्गावर दहेगाव शिवारात गुरूवारी पहाटे मालमोटार आणि तीन इंधन वाहतूक करणारे टँकर यांच्यात झालेल्या अपघातामुळे सायंकाळपर्यंत महामार्गावरची वाहतूक प्रचंड विस्कळीत झाली. अपघातात दोन वाहनांचे चालक जखमी झाले.

मनमाड शहरातून जाणाऱ्या महामार्गावर काही दिवसांपासून होणारी वाहतूक कोंडी चर्चेचा विषय झाली आहे. गुरूवारी पहाटे विचित्र अपघातामुळे दिवसभर वाहतुकीचा बोजवारा उडाला. पानेवाडी येथे असलेल्या तेल कंपन्यांमधून इंधनाने भरलेले तीन टँकर मनमाड - मालेगाव महामार्गावरून मालेगावकडे जात होते. तीनही टँकर एका पाठोपाठ जात होते. दहेगाव शिवारात मालेगावकडून मनमाडकडे भरधाव येणाऱ्या मालमोटारीने पहिल्या टँकरला समोरून जोरदार धडक दिली. या अपघाताने प्रचंड आवाज होऊन मालमोटार आणि पहिला टँकर रस्त्याच्या बाजुला उलटले, त्याच बरोबर त्याच्या मागून येणाऱ्या दोन टँकरलाही धडक बसली. हे दोन टँकर जागीच उभे राहिले, इंधन भरलेला एक टँकर उलटल्याने त्यातून इंधन बाहेर पडू लागले. अपघातात दोन जण जखमी झाले. अपघातानंतर या मार्गावरची दुहेरी वाहतूक ठप्प झाली. ऐन सकाळच्या वेळी चाकरमाने आणि विद्यार्थ्यांना याचा मोठा फटका बसला, इंदूर -पुणे राष्ट्रीय महामार्गावरची संपूर्ण वाहतुकच यामुळे ठप्प झाली.

मनमाड शहरातून जाणाऱ्या महामार्गावर अपघातानंतर लागलेली वाहनांची रांग

उद्यापासून बाळ येशू यात्रोत्सव

नाशिक : नाशिक-पुणे महामार्गावरील नेहरूनगरसमोरील सेंट झेवियर्स शाळेच्या आवारातील बाळ येशू मंदिरात १४ आणि १५ फेब्रुवारीला बाळ येशूची यात्रा होणार आहे. देशभरातून अडीच लाख भाविक दर्शनासाठी येण्याचा अंदाज संयोजकांनी व्यक्त केला आहे. यात्रा जवळ आल्यामुळे फेरीवाले, व्यापाऱ्यांनी दुकाने उभारण्यास सुरूवात केली आहे. देशभरातील भाविक आत्तापासूनच दर्शनाला येऊ लागले आहेत. बाळ येशूचे भारतातील हे पहिले मंदिर आहे. फेब्रुवारीच्या दुसऱ्या शनिवारी यात्रा सुरू होते. ती दोन दिवस चालते.

उपनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बाळ येशू चर्च, झेवियर्स स्कूल, फादर एरोल फर्नांडिस यात्रेचे संयोजन करीत असून पोलीस प्रशासनही त्यांच्या मदतीला आहे. दरम्यान, १६ फेब्रुवारीपर्यंत नऊ दिवसाची विशेष नोव्हेना (प्रार्थना) आयोजित केली जात आहे. या काळात नोव्हेना व ख्रिस्ती उपासना विधी होईल. यात्रा काळात इंग्रजी, मराठीत, कोंकणी भाषेत मिस्सा (विशेष प्रार्थना) होईल. सेंट झेवियर हायस्कूलच्या प्रांगणात उभारलेल्या शामियानात दर तासाला सकाळी सहापासून सायंकाळी आठपर्यंत तसेच १५ फेब्रुवारीला सकाळी सहा ते दुपारी एकपर्यंत विशेष कार्यक्रम होईल. त्यानंतर बाळ येशू यात्रेचा समारोप होईल. यात्रा काळात नाशिक-पुणे महामार्गावर वाहतूकीवर निर्बंध असतील. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे.

उद्या ‘इश्क प्यार मोहब्बत’ मैफल

नाशिक : शहरातील गोल्डन व्हॉइस स्टुडिओचा ‘इश्क प्यार मोहब्बत’ हा खास संगीतमय कार्यक्रम शनिवारी प्रेमदिनी आयोजित करण्यात आला आहे. परशुराम साईखेडकर नाट्यगृहात सायंकाळी सहा वाजता होणाऱ्या या विनामूल्य कार्यक्रमाची संकल्पना आयोजक ज्ञानेश वर्मा यांची आहे. गाजलेली जुनी आणि नवीन चित्रपट गाणी यावेळी गायक सादर करतील. अश्विनी सरदेशमुख, उत्तम टाकळकर, वैष्णवी पगारे, देवेंद्र विभूते, महबूब खान, योगेश मोरे, दिलीप काळे, हेमंत काथे, श्याम शहाणे, ज्ञानेश्वर मोरे, मोनिका भट्ट, संतोष भट्ट व संतोष गांगुर्डे हे गायक असून ध्वनी व्यवस्था पवन वंजारी सांभाळतील.

फिनिक्स एआरसी प्रायव्हेट लिमिटेड

PhoenixARC

नोंदणीकृत कार्यालय : तिसरा मजला, वॉलेस टॉवर, १३९-१४०/बी/१, सहार रोड व वेस्टर्न एक्स्प्रेस हायवेची क्रॉसिंग, विलेपार्ले (पू), मुंबई-४०० ०५७. **टेलि :** ०२२-६८४९ २४५०, **फॅक्स :** ०२२-६७४१ २३१३.
सीआयएन : U67190MH2007PTC168303 **ईमेल :** info@phoenixarc.co.in **वेबसाइट :** www.phoenixarc.co.in

ई-लिलाव-नि-विक्रीकरिता जाहीर सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ८ व ९ च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.

सूचना याद्वारा आम जनतेस तसेच विशेषकरून ऋणको/ हमीदार/ गहाणकारांना देण्यात येते की, **"मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड"**द्वारा (**पूर्वीची अॅस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड - अभिहस्तांकनकर्ता**) ऋणांच्या अभिहस्तांकनाच्या अनुसार "फिनिक्स एआरसी प्रायव्हेट लिमिटेड"कडे गहाण असलेल्या व याखाली नमूद केलेल्या मालमत्तेची विक्री याखाली दिलेल्या तपशीलानुसार **www.phoenixarc.co.in/** या वेबसाइटद्वारा **सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ८ व ९ यासह वाचलेल्या सरफेसी अॅक्टच्या तरतुदींच्या अनुसार** याखाली सविस्तरपणे दिलेली देणी रक्कम व पुढील व्याज, आकार व किंमत, इ.च्या वसूलीकरिता "ऑनलाईन ई-लिलाव" द्वारा **"जसे आहे जेथे आहे"**, **"जे काही आहे तेथे आहे"** व **"कोणत्याही आधाराशिवाय"** या तत्त्वावर करण्यात येणार आहे.

ई-लिलावाची तारीख व वेळ : १८.०३.२०२६/ स. ११:०० ते दु. ०२:००
(प्रत्येकी १५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह)

इरठे जमा करण्याची शेवटची तारीख : १७.०३.२०२६

ऋणको/ सह-ऋणको/ हमीदार/ लोन अकाऊंट	मागणी सूचना तारीख व रक्कम	स्थावर मालमत्तेचे वर्णन	राखीव किंमत/ इरठे
LAN : LXNAS00116-170044518 शाखा : नाशिक **ऋणको : मनोज सुरेश सोदे** **सह-ऋणको : ममता मनोज सोदे**	**२५.०७.२०२५** **रु. ४६,३०,७७३/- (रुपये शेहेचाळीस लाख तीस हजार सातशे त्र्याहत्तर फक्त) करिता**	रो हाऊस नं. ४, गणेश रेसिडंसी, सर्व्हे नं. ३५५/२ए, प्लॉट नं. २५, गणेश नगर, मौजे मनमाड, ता. मनमाड, जि. नाशिक, गणेश मंदिराजवळ, नाशिक-४२२००३, महाराष्ट्र.	**राखीव किंमत : रु. १३,५०,०००/-** **(रुपये तेरा लाख पन्नास हजार फक्त)/** **इरठे : रु. १,३५,०००/-** **(रुपये एक लाख पस्तीस हजार फक्त)**
LAN : LXNAS00216-170042337 शाखा : नाशिक २ **ऋणको : अनिश सुरेश नायर** **सह-ऋणको : शारदा सुरेश नायर** **हमीदार: किसन सुभाष चापलकर**	**२४.०६.२०२५** **रु. १७,६२,२६४/- (रुपये सतरा लाख बासष्ट हजार दोनशे चौसष्ट फक्त) करिता**	रुम नं. ३, तळमजल्यावरील व रुम नं. ७ पहिल्या मजल्यावरील, एनएमसी स्कूल नं. १३० जवळ, दत्तनगर, कार्गिल चौक, चुंचले अंबाड, नाशिक-४२२०१०, महाराष्ट्र.	**राखीव किंमत : रु. २,२५,०००/-** **(रुपये दोन लाख पंचवीस हजार फक्त)/** **इरठे : रु. २२,५००/-** **(रुपये बावीस हजार पाचशे फक्त)**

१. लिलावाचे आयोजन बोली कागदपत्रांच्या पुढील शर्ती व अटी आणि त्यात नमूद केलेल्या प्रक्रीयेनुसार करण्यात येत आहे. बोलीदार ई-लिलावाकरिता ठेवलेल्या सुरक्षित मत्तेचा तपशील, बोलीप्रक्रीयेबाबत माहिती व सहाय्य याकरिता आमचे ई-लिलाव सेवा-पुरवठाकार **मेसर्स आर्का ईमार्ट प्रायव्हेट लिमिटेड**च्या **https://www.auctionbazaar.com/** या वेबपोर्टलला भेट देऊ शकतील आणि बोली प्रपत्रे ऑनलाईन सादर करावयाची आहेत. स्वारस्य असलेले खरीददार सदर पोर्टलवर लिलाव शर्ती व अटी तसेच प्रक्रीया पाहू शकतील आणि संपर्क साधू शकतील : **संदिप उखार्डा रानित - ७७७६८७६७७८/ शामशोद्दीन नरोद्दीन अन्सारी - ९७६४९९१९९७, साईलेश आएंगर - ९८३३८०११५९** व सविस्तर तपशील वर नमूद केलेल्या वेबसाइटवर उपलब्ध आहे आणि त्यांच्या केंद्रिकृत हेल्पडेस्कवर संपर्क साधता येईल : +९१ ८३७०९ ६९६९६, ई-मेल आयडी : contact@auctionbazaar.com २. सर्व स्वारस्य असलेल्या खरीददारांनी/ बोलीदारांनी **https://www.auctionbazaar.com/** या वर नमूद केलेल्या पोर्टलवर त्यांचे नाव नोंदविणे आणि पूर्वोक्त तारीख व वेळेत ई-लिलावात सहभागी होण्याकरिता विनामूल्य युजर आयडी व पासवर्ड मिळवणे आवश्यक आहे. **३.** ई-लिलावात सहभागी होण्याकरिता इच्छुक खरीददार/ बोलीदारांनी वर नमूद केलेल्या इरठेच्या सादरीकरणाकरिता शेवटच्या तारखेस किंवा तत्पूर्वी पॅनकार्ड, कंपनी असल्यास मंडळाच्या ठरावाची प्रत व पत्त्याचा पुरावा यांच्या प्रतीसह राखीव किंमतीच्या १०% ची परतावा इसारा रक्कम ठेवीच्या प्रदानाचा तपशील **वर नमूद केलेल्या इरठेच्या शेवटच्या तारखेस किंवा तत्पूर्वी** सादर करावयाचा आहे. **स्वारस्य असलेले खरीददार/ बोलीदारांनी यावर सविस्तरपणे दिल्यानुसार प्रत्येक आयटम/ मालमत्तेकरिता स्वतंत्र इरठे सादर करणे आवश्यक आहे. ४.** लिलावाच्या कोणत्याही स्तरावर, प्राधिकृत अधिकारी कोणतीही पूर्व-सूचना दिल्याशिवाय व त्याकरिता कोणतेही कारण न दाखवता लिलाव पुढे ढकलण्याचा किंवा बोली/ प्रस्ताव स्वीकारण्याचा/ नामंजूर करण्याचा/ फेरबदल करण्याचा/ रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवीत आहेत. **५.** यशस्वी खरीददार/ बोलीदार कोणतीही सांविधिक देणी, कर, देय शुल्क, खरेदी विचाराधीन लागू जीएसटी, स्टँप ड्युटी, नोंदणी शुल्क, इ. सोसतील, जे लागू कायद्यानुसार त्याच्या/ तिच्या नावे मालमत्तेच्या अभिहस्तांकनाच्या दृष्टिने प्रदान करणे आवश्यक आहे. **६.** स्वारस्य असलेल्या बोलीदारांनी त्यांच्या बोली सदर करण्यापूर्वी सांविधिक देणी, इ. समाविष्ट सुरक्षित मत्तेस बाधक ठरणारे दावे/ हक्क/ देणी आणि लिलावात ठेवलेल्या सुरक्षित मत्तेचा नामाधिकार, भार या संबंधित त्यांनी स्वतः चौकशी करावी. लिलाव जाहीरात "फिनिक्स"ची कोणतीही बांधिलकी किंवा प्रतिनिधीत्व मानीव ठरत नाही किंवा सिद्ध होत नाही. "फिनिक्स"चे प्राधिकृत अधिकारी त्रयस्थ पक्षकाराचे कोणतेही दावे/ हक्क/ देणी याकरिता कोणत्याही स्थितीत जबाबदार असणार नाहीत. **७.** भावी/ स्वारस्य असलेले बोलीदार वचनबद्धता लिहून देतील की, तो / ती नादारी व दिवाळखोरी संहिता, २०१६ च्या कलम २९(ए) च्या तरतुदीनुसार अपात्र नाही आणि केवायसी कागदपत्रांसमवेत सदर वचनबद्धता सादर करण्यास असमर्थ ठरल्यास तो/ ती आपोआप अपात्र ठरला/ ठरली जाईल किंवा त्याची/ तिची बोली नामंजूर करण्यात येईल.

स्थळ : महाराष्ट्र
दिनांक : १३.०२.२०२६

भाषांतरामध्ये त्रुटी आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.

स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी,
फिनिक्स एआरसी प्रायव्हेट लिमिटेड

चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड

Chola Enter a better life

कॉर्पोरेट कार्यालय: ‘चोला क्रेस्ट’, सी ५४ व ५५, सुपर बी-४, थिरू वी का इंडस्ट्रीयल इस्टेट, गिंडी, चेन्नई - ६०००३२.

ताबा सूचना (नियम ८(१) (अचल मालमत्तेसाठी)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे मे. चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट अँड फायनान्स कंपनी लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२, यापुढे अधिनियम असा उल्लेख करण्यात येईल, अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, २००२ मधील नियम ३ सह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद १३(१२) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत मागणी सूचना पाठवल्या ज्यात खाली स्तंभ [ब] मध्ये ज्यांची नावे नमूद करण्यात आलेली आहेत त्या कर्जदारांना स्तंभ [क] मध्ये नमूद दिनांकास खाली स्तंभ [ड] मध्ये दर्शविलेल्या थकबाकी रकमेचा तीवरील व्याजासह सदर सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून ६० दिवसांचे आत भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

कर्जदारांनी सदर रकमेची परतफेड न केल्याने याद्वारे कर्जदार व सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की निम्नस्वाक्षरीकारांनी त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांमधील नियम ८ सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील अनुच्छेद १३(४) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा १० फेब्रुवारी, २०२६ रोजी ताबा घेतलेला आहे.

अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदारांचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद १३ मधील उप-विभाग (८) च्या तरतुदींकडे वेधण्यात येते.

कर्जदार व सर्वसामान्य जनतेस सावधगिरीची सूचना देण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास तो मे. चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड च्या स्तंभ [ड] मध्ये नमूद रक्कम आणि तीवरील व्याजाच्या भाराधीन असेल.

अ. क्र.	कर्जदाराचे नाव व पत्ता आणि कर्ज खाते क्र.	मागणी सूचना दिनांक	थकबाकी रक्कम	अचल मालमत्तेचे वर्णन	ताबा दिनांक
[अ]	[ब]	[क]	[ड]	[ई]	[एफ]
१	**कर्ज खाते क्र.** **TL01NGP0000061956** **१. ए. होरायझन बायोकेमिकल्स** **२. श्री अभिषेक श्यामकांत वटे आणि** **३. श्रीमती कल्याणी अभिषेक वटे**	१३.११.२०२५	**१३.११.२०२५ रोजी रु. ९२,२५,६८९/- अधिक तीवरील व्याज.**	आरसीसी बांधकाम असलेली सदनिका क्र. ४०१, क्षेत्रफळ सुमारे १२१.२३७ चौ.मी. (सुपर बिल्ट-अप क्षेत्रफळ), चौथा मजला, श्रीपाद पॅराडाईज, सोबत प्लॉट क्र. ४९, क्षेत्रफळ १९५.१० चौ.मी. (२१००.०० चौ.फू.) जमिनीमधील १६.६६७% अविभाजित हिस्सा, तेथील महापालिका घर क्र. ३१८५/डी/४९ हे बांधकाम, वॉर्ड क्र. २०, ख.क्र. ७०/१, मौजा दिघोरी, सिटी सर्वे एकर. २९२, शीट क्र. ४५२/५३, प.ह.न. ३४, साई सेवाश्रम गृह निर्माण सहकारी संस्था लि. चे लेआउट, नागपूर महानगर पालिकेच्या आणि नागपूर सुधार प्रन्यासच्या हद्दीत, तहसील व जि. नागपूर ४४००२४. चतुःसीमा: पूर्वेस - प्लॉट क्र. ४८, पश्चिमेस - खसऱ्याची हद्द, उत्तरेस - ३० फूट रुंदी असलेला रस्ता, दक्षिणेस - खसऱ्याची हद्द.	१०.०२.२०२६
२	**कर्ज खाते क्र.** **TL01NGP0000060713** **१. मे. विद्यासागर कोचिंग क्लासेस,** **२. श्री सुरेंद्र लक्ष्मण नगराळे** **३. श्रीमती मनीषा सुरेंद्र नगराळे**	१७.११.२०२५	**१७.११.२०२५ रोजी रु. ८८,३१,८८२/- अधिक तीवरील व्याज.**	एकूण सुमारे २.०० हे आर पैकी स्मरे १.०० हेआर क्षेत्रफळ असलेल्या सर्वे क्र. ६५५ या बिगर-शेती जमिनीमधील उत्तरेकडील भाग (ख.क्र. ६५५/१ असा क्रमांक देण्यात आला आहे), मौजा सालोड (हि), तह. व जि. वर्धा ४४२००१, ग्रामपंचायत सालोड च्या हद्दीत आणि मालमत्तेच्या चतुःसीमा: पूर्वेस - पांधण, पश्चिमेस - पांधण, उत्तरेस - पांधण, दक्षिणेस - सर्वे क्र. ६५५ चा उर्वरित भाग.	१०.०२.२०२६

दिनांक : १३.०२.२०२६
स्थान : चेन्नई

प्राधिकृत अधिकारी
मे. चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड

वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लि.

VASTU HOUSING FINANCE

युनिट २०३ आणि २०४, २रा मजला, ''ए'' विंग, नवभारत इस्टेट, झकेरिया बंदर रोड, शिवडी (पश्चिम),
मुंबई - ४०००१५. महाराष्ट्र. सीआयएन क्र. : यू६५९२२एमएच२००५पीएलसी२७२५०१

स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ (६) ची तरतुद सहवाचता सिक्युरिटायजेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अॅण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.

सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदार/सह-कर्जदार/गहाण ठेवणाऱ्यांना सूचना देण्यात येत आहे की, खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्ता ज्या सुरक्षित धनको यांच्याकडे गहाण ठेवल्या आहेत, ज्याचा प्रतिकात्मक ताबा वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे, त्यांना येथून पुढे वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड असे संबोधले जाईल. सुरक्षित मालमत्ता ई-लिलावाद्वारे ''जसे आहे, तिथे आहे'', ''जसे आहे, जे आहे'' आणि ''तिथे जे काही आहे'' या तत्त्वावर विकल्या जातील.

सर्वसामान्यांना कळविण्यात येते की, आम्ही **https://sarfaesi.auctiontiger.net** या वेबसाइटद्वारे जाहीर ई-लिलाव करणार आहोत.

अ. क्र.	खाते क्र. आणि कर्जदार, सह-कर्जदार, गहाण ठेवणाऱ्यांचे नाव	कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचनेनुसार तारीख आणि रक्कम आणि प्रतीकात्मक ताबा मिळाल्याची तारीख	मालमत्तेचे/संपत्तीचे वर्णन	आरक्षित किंमत, इसारा ठेव अनामत (रु. मध्ये)	ई-लिलावाची तारीख आणि वेळ, ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख, तपासणीची तारीख
१	एलपी०००००००१७१४८५ महेश गोरखनाथ ठोंबरे (कर्जदार), गोरख मधुकर ठोंबरे (सह-कर्जदार), सुनीता गोरख ठोंबरे (सह-कर्जदार), आर्या अनिल पाटील (सह-कर्जदार)	मागणी सूचना तारीख ११ मार्च, २५ आणि रक्कम रु. ५३६९३१/- दि. ०९ मार्च, २५ रोजीनुसार + व्याजदर इ. आणि दि. २४ जून, २५	मोजमापे प्लॉट क्षेत्रफळ २४५० चौरस फूट आणि बिल्टअप क्षेत्रफळ २४५० चौरस फूट मालमत्ता क्र. १८८ (घर क्र. १८८) येथे पोस्ट पुरणगाव ता. येवला जि. नाशिक येवला - ४२३४०१.	रु. ८८२०००/- रु. ८८२००/-	दि. १४.०३.२०२६ वेळा सकाळी १०.०० वा. ते दुपारी १२.०० वा. पर्यंत दि. १३.०३.२०२६ रोजी सायं. ५.०० वा. पर्यंत, दि. २४.०२.२०२६

१. सर्व इच्छुक सहभागी / बोलीदारांना https://sarfaesi.auctiontiger.net या वेबसाइटला भेट देण्याची विनंती करण्यात येत आहे. ई-लिलावाबद्दल तपशील, मदत, प्रक्रिया आणि ऑनलाईन प्रशिक्षणासाठी, संभाव्य बोलीदार मेसर्स ई-प्रोक्योरमेंट टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड (ऑक्शनटायगर) यांच्याशी संपर्क साधू शकतात; पत्ताः मुख्य कार्यालयः बी-७०५, वॉल स्ट्रीट II, ओरिएंट क्लबसमोर, गुजरात कॉलेजजवळ, एलिस ब्रिज, अहमदाबाद - ३८० ००६ गुजरात (भारत). संपर्क व्यक्तीः श्री. राम शर्मा संपर्क क्र.: ८०००२३२९७/ ९२६५५६२८१८/ ९२६५५६२८२१/०७९-६८१३६८४२/६८६९. ईमेल आयडीः ramprasad@auctiontiger.net, support@auctiontiger.net
२. अटी आणि शर्तीबद्दल अधिक माहितीसाठी, ई-लिलावात भाग घेण्यासाठी कृपया https://sarfaesi.auctiontiger.net ला भेट द्या.
३. मालमत्तेबद्दल अधिक माहितीसाठी कृपया अधिकृत अधिकाऱ्यांशी संपर्क साधा : नसीम अहमद संपर्क क्र.: ९०२१०७७७८६

सदर ही सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८(६) अंतर्गत ३० दिवसांची वैधानिक विक्री सूचनादेखील आहे.

दिनांकः १३.०२.२०२६
ठिकाण : नाशिक

अधिकृत अधिकारी
वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लि.

परिशिष्ट -४-ए स्थावर मालमत्तेची ई-लिलाव-जाहीर विक्री सूचना

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८(६) च्या तरतुदीनुसार सहवाचता सिक्युटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल अॅसेट अॅण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव-विक्री सूचना.

नोंदणीकृत कार्यालयः- ९ वा मजला, अंतरीक्ष भवन, २२ कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली -११०००१, फोनः-०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेबः- www.pnbhousing.com बी.ओ. नाशिकः ४०७ आणि ४०८, ४था मजला, पद्मविश्व लँडमार्क, तनिष्क शोरूमजवळ, अॅक्सिस बँकच्यावर, राक्का कॉलनी, शरणपूर रोड, नाशिक - ४२२००२.

याद्वारे सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदार यांना रकाना क्र. - ए मध्ये सूचित केलेले नोटीस देण्यात आली आहे की, खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन कॉलम क्र -डी मध्ये गहाण/ सुरक्षित धनको/ मेसर्स पीएनबी हाउसिंग फायनान्स लिमिटेड यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने (रकाना क्र. - सी यामध्ये वर्णन केल्याप्रमाणे) ज्याचा रचनात्मक/ भौतिकदृष्ट्या ताबा सुरक्षित धनको यांनी घेतला आहे, त्याची खाली नमूद केलेल्या तपशिलांनुसार ‘जसे आहे, तिथे आहे, जे आहे, तसे आहे’ आणि ‘तेथे जे काही आहे या तत्त्वावर’ विक्री केली जाईल. तारखेनुसार सुधारित असलेल्या सिक्युरिटी इंटरेस्ट इन्फोर्समेंट नियम, २००२ च्या नियम - ८ (६) आणि ९ अंतर्गत रकाना क्र. ए यात दर्शवलेल्या प्रकरणाप्रमाणे याद्वारे कर्जदार/गहाण ठेवणारे/कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी, (ज्ञात किंवा अनोळखी), निष्पादक, प्रशासक, उत्तराधिकारी, संबंधित कर्जदार/गहाण ठेवणारे (मृत झाल्यापासून) यांना नोटीस देण्यात आली आहे. विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तीसाठी, कृपया मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/ सुरक्षित धनकोच्या वेबसाइटवर प्रदान केलेल्या दुव्याचा संदर्भ घ्या म्हणजे www.pnbhousing.com.

कर्ज क्र., कर्जदार/सह-कर्जदार/ जामीनदार/कायदेशीर वारस यांचे नाव (ए)	मागणी केलेली रक्कम आणि तारीख (बी)	ताब्यात घेण्याचे स्वरूप (सी)	गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन (डी)	आरक्षित किंमत (आरपी) (ई)	ईएमडी (आरपीच्या १०%) (एफ)	बोली सादर करण्याची अंतिम तारीख (जी)	बोली वृद्धी दर (एच)	तपासणीची तारीख आणि वेळ (आय)	लिलावाची तारीख आणि वेळ (जे)	ज्ञात भार न्यायालयीन प्रकरणे, जर असतील तर (के)
एनएचएल/एनएसके/१११९/ ७५४१४३ नरेंद्रकुमार मधुकर राणे/ प्रीती नरेंद्रकुमार राणे बी.ओ.: नाशिक	रु. ३१,३४,८७५.३ आणि दि. १७.११.२०२१	भौतिकदृष्ट्या ताबा	कार्यालय क्र. ४,५,६, २रा मजला प्रतिभा संकुल, तरण तलावसमोर, बिटको कॉलेजच्यामागे, नाशिक रोड नाशिक, महाराष्ट्र - ४२२१०१, भारत.	**रु. २५,३१,०००**	**रु. २,५३,१००**	दि. २७.०२.२०२६	**रु. १०,०००**	**दि. २५.०२.२०२६ रोजी दुपारी १२.०० वा. ते ०४.०० वा. दरम्यान**	दि. २८.०२.२०२६ रोजी दुपारी ०२.०० वा. ते ०३.०० वा. दरम्यान	माहीत नाही
एचओयू/एनएसके/०८१७/४१६६३१ आणि एनएचएल/एनएसके/१०१८/५८५३०९ धोंडीराम चिंतामण लोहकरे/ मनीषा धोंडीराम लोहकरे बी.ओ.: नाशिक	रु. २५,०८,५९३.७४ आणि दि. २३.०६.२०२१	भौतिकदृष्ट्या ताबा	फ्लॅट क्र. बी १३, तळमजला, श्रीमंत होम्स, इमारत बी अनु. क्र. ७९ २अ आणि ७९ ४अ, मातोश्री प्रेरणा लॉन्ससमोर, साई पॅलेस हॉटेलच्यामागे, विजय नगर, मौजे भगूर, महाराष्ट्र- ४२२५०२, भारत.	**रु. १३,८३,०००**	**रु. १,३८,३००**	दि. २७.०२.२०२६	**रु. १०,०००**	**दि. १८.०२.२०२६ रोजी दुपारी १२.०० वा. ते ०४.०० वा. दरम्यान**	दि. २८.०२.२०२६ रोजी दुपारी ०२.०० वा. ते ०३.०० वा. दरम्यान	माहीत नाही

*आनुषंगिक खर्च, खर्च, शुल्क इ. देय झाल्याच्या तारखेपर्यंत आणि/ किंवा त्याची प्राप्ती होईपर्यंत संबंधित पुढील व्याज @१८% दरसाल लागू आहे. ** पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या अधिकृत अधिकाऱ्याच्या सर्वोत्तम माहिती आणि ज्ञानानुसार, यावर नमूद केलेल्या स्थावर/सुरक्षित मालमत्तेच्या संदर्भात इतर कोणतेही दायित्व/ दावे नाहीत, जे कॉलम क्र.- के यामध्ये उघड केले आहे. यशस्वी खरेदीदार/ बोलीदाराकडून त्याच्या/ तिच्या शेवटी पूर्ण केले जातील/अदा केले जातील. संभाव्य खरेदीदार/ बोलीदारांना विनंती करण्यात आली आहे की, त्यांनी नमूद केलेल्या भारांची सत्यता स्वतंत्रपणे पडताळून पाहावी. (१.) आजपर्यंत, वरील स्थावर मालमत्ता/सुरक्षित मालमत्ता विकण्यापासून, वेगळे करण्यापासून आणि/ किंवा विल्हेवाट लावण्यापासून पीएनबीएचएफएल/ पीएनबीएचएफएल यांच्या अधिकृत अधिकाऱ्याला प्रतिबंधित करणारा कोणताही आदेश आणि/ किंवा न्यायालयीन मनाई आदेश नाही आणि स्थिती स्तंभ क्रमांक-के मध्ये नमूद केली आहे. (२.) संभाव्य खरेदीदार/ बोलीदार आणि इच्छुक पक्ष स्तंभ क्र.- के यामध्ये नमूद केलेल्या कार्यवाही/ आदेश इत्यादींमधील विनंतीची स्वतंत्रपणे तपासणी करू शकतात. पीएनबीएचएफएल यांच्याकडे उपलब्ध असलेल्या मालकीच्या कागदपत्रांच्या शीर्षकासह परंतु त्यापुरते मर्यादित नाही आणि निविदा/ बोली अर्ज सादर करण्यापूर्वी किंवा प्रस्ताव देण्यापूर्वी सर्व बाबतीत स्वतःचे समाधान करावे लागेल. बोली लावणाऱ्याला बोली अर्जासह या लिलावाच्या अटी आणि शर्तीवर स्वाक्षरी करावी लागेल. (३.) कृपया लक्षात ठेवा की, सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ९(३) यानुसार, बोलीदार/ खरेदीदार कायदेशीररित्या विक्री किमतीच्या २५% रक्कम (इसारा ठेव अनामतसहित) त्याच दिवशी किंवा पुढील कामकाजाच्या दिवसाच्या आत जमा करण्यास बांधील आहे. सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ९(२) यानुसार, सिक्युरिटी लेनदाराने विक्री किमतीच्या २५% रक्कम प्राप्त केल्यानंतरच (बोलीदाराच्या नावे) विक्रीची पुष्टी केली जाऊ शकते. विक्री पुष्टीकरण पत्र मिळाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत खरेदीदाराने उर्वरित ७५% रक्कम जमा करावी लागेल आणि अशी ठेव न भरल्यास, विक्री पुष्टीकरण पत्रात नमूद केलेल्या १५ दिवसांच्या अनिवार्य कालावधीच्या समाप्तीच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत अधिकृत अधिकारी विक्री विचारार्थ रकमेचा काही भाग जप्त करेल आणि सरफेसी कायद्याच्या तरतुदींनुसार मालमत्ता/तारण असलेली मालमत्ता पुन्हा विकली जाईल. (४.) मेसर्स सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड अधिकृत अधिकाऱ्यांना ई-लिलावाद्वारे विक्री करण्यास मदत करेल ज्याचे कॉर्पोरेट कार्यालय प्लॉट क्र. ६८, ३ मजला, सेक्टर ४४, गुडगाव, हरियाणा १२२००३ येथे आहे, वेबसाइट - www.bankeauctions.com मालमत्तेच्या तपासणीशी संबंधित कोणत्याही मदतीसाठी किंवा बोली कागदपत्रे मिळविण्यासाठी आणि इतर कोणत्याही प्रश्नांसाठी किंवा नोंदणीसाठी, तुम्हाला गणेश अंकुश/निलाक्षी पाटील टोल फ्री क्र. - १८०० १२० ८८००, ई-मेलः auction@pnbhousing.com यांच्याशी संपर्क साधावा लागेल, जो पीएनबीएचएफएल यांचा अधिकृत व्यक्ती आहे किंवा www.pnbhousing.com चा संदर्भ घ्या.

ठिकाणः नाशिक दिनांकः- १३.०२.२०२६

सही/- अधिकृत अधिकारी, पीएनबी हाउसिंग फायनान्स लिमिटेड

अॅसेट रिकंस्ट्रक्शन कंपनी (इंडिया) लिमिटेड, (अर्सिल)

Arcil

विविध अर्सिल ट्रस्टचे विश्वस्त म्हणून कार्यरत असेलेले, आर्सिल कार्यालय : दि रुबी, १० वा मजला, २९, सेनापती बापट मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई ४०००२८
सीआयएनः यू६५९९९एमएच२००२पीएलसी१३४८८४ संकेतस्थळ : https://auction.arcil.co.in

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ६, ८ आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल अॅसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ (सरफेसी कायदा) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून ऑन लाईन ई-लिलावाद्वारे विक्रीसाठी जाहीर सूचना

सूचना ह्याद्वारे सामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदारा (रां)/ हमीदारा (रां)/ गहाणदारा (रां) ना देण्यात येत आहे की अॅसेट रिकंस्ट्रक्शन कंपनी (इंडिया) लिमिटेड, विविध अर्सिल ट्रस्ट (अर्सिल) चे विश्वस्त म्हणून कार्यरत असलेले (नोंदणीकृत अभिहास्तांकन कराराद्वारे वित्तिय मालमत्तेच्या अभिहास्तांकनाच्या अनुपालन) ह्यांच्याकडे गहाण/ प्रभारीत ठेवण्यात आलेल्या खालील स्थावर मालमत्तांची विक्री थकीत देण्यांसह त्यावरील व्याज, भार आणि शुल्क इत्यादींच्या वसुलीसाठी सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या (“नियमावली”) नियम ६, ८ आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल अॅसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ (“कायदा”) च्या खालील तपशिलवार अटींच्या अनुसार “जे आहे जेथे आहे”, “जे आहे जसे आहे” “जेथे आहे तेथे आहे” आणि “कोणत्याही आधाराशिवाय” विक्री करण्यात येईल.

अनु. क्र.	कर्जदार / सह-कर्जदार / रां हमीदार / रां / गहाणदार / रांचे नाव	एलएएन आणि सिलिंग बँक	न्यासाचे नाव	सरफेसी सूचने अनुसार थकीत रक्कम	ताबा प्रकार आणि दिनांक	पाहणीचा दिनांक	मालमत्तेचा प्रकार आणि क्षेत्र	इसारा रक्कम ठेव (इरठे)	राखीव मूल्य	ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ
१	कर्जदार: १. कृष्णा पाटीलबा जाधव, आशा कृष्णा जाधव	१०१०३७२९४२ सिलिंग बँक मुथूट हाऊसिंग फायनांस कंपनी लिमिटेड (एमएचएफसीएल)	अर्सिल - रिटेल लोन पोर्टफोलियो -०८६ए-ट्रस्ट	१४ मार्च २०१९ अनुसार रु. ७,०४,७५९.९९/- (रुपये सात लक्ष चार हजार सातशे एकूणसाठ आणि नव्याणव पैसे मात्र) + त्यावरील व्याज + कायदेशीर खर्च दिनांकित १५-०३-२०१९	२०-११-२०२३ रोजी प्रत्यक्ष	विनंती नुसार	घर	रु. ८४,२००/- (रुपये चौऱ्याऐंशी हजार दोनशे मात्र)	रु. ८,४२,०००/- (रुपये आठ लक्ष बेचाळीस हजार मात्र)	१०-०४-२०२६ रोजी ०२:३० वा.
	लिलाव करण्यात येणाऱ्या सुरक्षित मालमत्तेचे वर्णन: सदनिका क्र. बी ०८, ३ रा मजला, एस क्र. ७८ २ ३६, यश लक्ष्मी निसर्ग, प्लॉट क्र. ८७, श्री शनी मंदिरामागे, पेठ रोड, गोविंद मामा चौकाजवळ, नाशिक, पंचवटी, एस. ओ. महाराष्ट्र ४२२००३. पूर्व: साईड मार्जिन, पश्चिम: सदनिका क्र. बी-०९ ए, दक्षिण: सदनिका क्र. बी ०८ ए, उत्तर: मार्जिनल स्पेस.									
२	कर्जदार: १. राजेंद्र सुधाकर तोरणमल, शुभांगी राजेंद्र तोरणमल	१०१०४०६८७५१ सिलिंग बँक मुथूट हाऊसिंग फायनांस कंपनी लिमिटेड (एमएचएफसीएल)	अर्सिल - रिटेल लोन पोर्टफोलियो -०८६ए-ट्रस्ट	२२ मे २०१९ अनुसार रु. ३,६७,२०२.७३/- (रुपये सात लक्ष चार हजार सातशे एकूणसाठ आणि नव्याणव पैसे मात्र) + त्यावरील व्याज + कायदेशीर खर्च दिनांकित २३-०५-२०१९	२१-ऑगस्ट-२०२४ रोजी प्रत्यक्ष	विनंती नुसार	घर	रु. ६८,१००/- (रुपये अडुसष्ट हजार शंभर मात्र)	रु. ६,८१,०००/- (रुपये सहा लक्ष एक्क्याऐंशी हजार मात्र)	३०-०३-२०२६ रोजी ०२:०० वा.
	लिलाव करण्यात येणाऱ्या सुरक्षित मालमत्तेचे वर्णन: गट क्र. ९९, चिंतामणी बिल्डींग, सदनिका क्र. एस-६, तिसरा मजला, ए श्री अष्टविनायक वसाहत (फेज II), गंगापूर (जहांगीर), स्कोडा ऑटो जवळ, औरंगाबाद, महाराष्ट्र ४३११०३ पूर्व: कंपाउंड भिंत, पश्चिम: अंतर्गत रोड, उत्तर: चिंतामणी ए सदनिका क्र. एस ७, दक्षिण: चिंतामणी ए सदनिका क्र. एस ५.									

आर्सिलला ज्ञात प्रलंबित प्रकरणे	नाहीत	अर्सिलला ज्ञात बोझा/ देणी	नाहीत
बोली सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक	त्याच दिवशी लिलावापूर्वी २ तास	बोली वाढ रक्कम	बोली कागदपत्रामध्ये नमूद केल्यानुसार
ह्यांच्या नावे करायचा डिमांड ड्राफ्ट	अर्सिल-रिटेल-लोन पोर्टफोलियो-०८६ए-ट्रस्ट	पेएबल अॅट पार	
आरटीजीएस तपशील:	अर्सिल-रिटेल-लोन पोर्टफोलियो-०८६ए-ट्रस्ट ट्रस्ट खाते क्र. ५७५००००१२२४९६०, बँकेचे नाव: एचडीएफसी बँक लिमिटेड, शाखा: कमला मिल, सेनापती बापट मार्ग, लोवर परेल, मुंबई. आयएफएससी: एचडीएफसी००००५४२		
संपर्क व्यक्तीचे नाव आणि क्रमांक	गोविंद बलराम शर्मा : ९२१२४४३१८१ (authorisedofficer@muthhot.com), monica.rudra@arcil.co.in		

अटी आणि शर्ती: १. लिलाव विक्री ई-लिलावाद्वारे https://auction.arcil.co.in या संकेतस्थळाद्वारे आणि बोली दस्तऐवजाच्या अटी व शर्तीनुसार आणि त्यात नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार केली जात आहे. २. अधिकृत अधिकारी ("एओ")/ अर्सिल यांना इंटरनेट कनेक्टिव्हिटी, नेटवर्क समस्या, सिस्टम क्रॅश डाउन, पॉवर फेल इ.साठी जबाबदार धरले जाणार नाही. ३. लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, एओ कोणतेही कारण न देता आणि कोणतीही पूर्वसूचना न देता बोली/ ऑफर स्वीकार/नाकारू/सुधारू/रद्द करू शकतो किंवा लिलाव पुढे ढकलू शकतो. ४. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराला कोणतेही वैधानिक देय, कर, देय शुल्क, खरेदी मोबदल्यावरील लागू जीएसटी, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. सुरक्षित मालमत्ता लागू कायद्यानुसार त्याच्या/तिच्या/त्याच्या बाजूने पोचवले/वितरवले मिळविण्यासाठी भरावे लागणार आहे. ५. इच्छूक बोलीदारांनी त्यांची स्वतःची स्वतंत्र चौकशी/ बोजा, सुरक्षित मालमत्तेचे शीर्षक आणि सुरक्षित मालमत्तेवर परिणाम करणारे दावे/हक्क/देय, वैधानिक देय, इत्यादींबाबत आधीपासून करावी. त्यांची बोली सबमिट करत आहे. लिलावाची जाहिरात एआरसीआयएलची कोणतीही वचनबद्धता किंवा कोणतेही प्रतिनिधित्व बनवत नाही आणि बनवणार नाही. अर्सिल चे अधिकृत अधिकारी कोणत्याही तृतीय पक्षाच्या दाव्या/अधिकार/देयांसाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही. ६. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लिलावाच्या सूचनेमध्ये नमूद केलेले तपशील हे अधोस्वाक्षरी केलेल्या व्यक्तींच्या माहितीसाठी सर्वोत्तम असल्याचे सांगितले आहे; तथापि, खाली स्वाक्षरी केलेले कोणत्याही त्रुटी, वगळणे, चुकीच्या विधानासाठी जबाबदार/उत्तर असणार नाही. ७. कर्जदार/जमीनदार/गहाणदार, जे या थकबाकीसाठी जबाबदार आहेत, त्यांनी या विक्री सूचनेला सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियमांच्या नियम ८ आणि ९ अंतर्गत, वरील धारणेबाबत सूचना असल्याचे समजावे. ८. येथे नियोजित केलेला लिलाव कोणत्याही कारणास्तव अयशस्वी झाल्यास, अर्सिल ला नियम आणि कायद्याच्या नियम ८ (५) च्या तरतुदींनुसार इतर कोणत्याही पद्धतींनी सुरक्षित मालमत्ता विकण्याचा अधिकार आहे.

ठिकाण: नाशिक
दिनांक: १३-०२-२०२६

सही/- अधिकृत अधिकारी
अॅसेट रिकंस्ट्रक्शन कंपनी (इंडिया) लि,